मोनोचे भवितव्य अन्य
मेट्रो मार्गांवर अवलंबून



वृत्त माय ३ ▸

# मोनोचे भवितव्य अन्य मेट्रो मार्गांवर अवलंबून

## प्रवासी संख्या वाढवण्याचा प्रयत्न; तात्काळ जोडणी अशक्यच

**मुंबई : जयंत होवाळ**

पांढरा हत्ती ठरलेल्या मोनो रेल्वेला ट्रॅकवर आणण्यासाठी एमएमआरडीएचे प्रयत्न सुरूच आहेत. मुंबईत सुरू असलेल्या मेट्रो मार्गांना मोनोची जोडणी देऊन प्रवासी संख्या वाढवता येईल का, असा एमएमआरडीएचा प्रयत्न आहे.

२ फेब्रुवारी २०१४ रोजी चेंबूर ते वडाळा हा पहिला टप्पा, तर ४ मार्च २०१९ पासून वडाळा ते सातरस्ता हा दुसरा टप्पा वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. मोनोचे दोन्ही टप्पे सुरू झाले असले तरी, प्रवासी संख्या काही वाढलेली नाही. प्रवासी संख्या वाढण्यापेक्षा तोटाच वाढत आहे. मोनोचा कारभार हाती घेण्यास कोणी खासगी कंपनी पुढे येईल का, या दृष्टीने एमएमआरडीएने मध्यंतरी प्रयत्न करून पाहिला. परंतु, मोनोचा पांढरा हत्ती सांभाळण्यास कोणत्याही खासगी कंपनीने स्वारस्य दाखवले नाही. सध्या एमएमआरडीएच मोनोचा कारभार सांभाळत आहे. अनेक प्रयत्न करूनही मोनोची प्रवासी संख्या काही वाढत नाही, ही एमएमआरडीएची डोकेदुखी आहे. त्यामुळे मेट्रो मार्गांना मोनोची जोडणी देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

मुंबईतील जे भाग सध्या उपनगरीय रेल्वेने जोडले गेलेले नाहीत अथवा मेट्रोने जोडले जाऊ शकत नाहीत, असे भाग मोनोने जोडले आहेत. शिवाय वडाळा, लोअर परळ, चेंबूर या ठिकाणी मोनो उपनगरीय रेल्वेशी जोडली आहे. आता व्ही. एन. पुरव मार्ग येथे मेट्रो मार्ग-२ -ब, संत गाडगे महाराज चौक स्थानकाजवळ मेट्रो मार्ग - ३ व भक्ती पार्क येथे मेट्रो मार्ग - ४ ला मोनोची जोडणी दिली जाणार आहे. त्यामुळे विविध मार्गांची अंतिम टोके जोडणे सोईस्कर होईल, असा एमएमआरडीएचा होरा आहे. मेट्रो मार्गांना मोनो जोडल्यास भविष्यात मोनोची प्रवासी संख्या वाढेल, अशी एमएमआरडीएला अपेक्षा आहे. एकूणच मेट्रो मार्गांवरच मोनोचे भवितव्य अवलंबून असणार आहे. या प्रयत्नांना यश आले तर मोनोचे गाडे रुळावर येईल.



■ मोनोची प्रती तास प्रती दिशा ७५०० प्रवासी वाहून नेण्याची क्षमता आहे. मात्र निम्म्यानेही प्रवासी मोनोने प्रवास करत नाहीत. मुळात अन्य मार्गांना जोडणी दिली तरी त्या क्षमतेने वाहतूक करण्यास आणि तेवढ्या संख्येने फेऱ्या करण्यासाठी मोनोकडे पुरेशा ट्रेन नाहीत.जेमतेम सात ट्रेनच्या जीवावर मोनोचा कारभार हाकला जात आहे. आणखी १० नव्या गाड्या ताफ्यात येणार असल्या, तरी त्यासाठी आणखी काही वर्षांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्या अवधीत किमान दोन ते तीन मेट्रो मार्ग सुरू होतील. परंतु, पुरेशा ट्रेन नसल्याने तात्काळ मोनोची जोडणी अन्य मेट्रो मार्गांना मिळेल अशी शक्यता कमीच आहे.